# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
### राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान
### राज्य प्रकल्प संचालनालय (रुसा)
युनिट क्र. २, १८ वा माळा, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१,
कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.

ई-मेल- spdrusamah@gmail.com दूरध्वनी क्र.०२२-२२१६०९४३/५९


क्र.राप्रसं/रुसा/आदेश/२०१८-१९/७३८ दिनांक - २१/१२/२०१८

## कार्यालयीन मंजूरी आदेश

**विषय :-** राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा २.० ) योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून मंजूर झालेल्या निधी वाटपास मंजूरी देणेबाबत.

**संदर्भ :-** १) केंद्र शासनाचे पत्र क्र. F No. २४-३७/२०१४-U.Policy(MHEQESAC-Gen/SC/ST) dated १६ नोव्हेंबर, २०१८.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. रुसायो-२०१८/प्र.क्र. ३४३/विशि-३, दि. १७ डिसेंबर, २०१८.

**प्रस्तावना -**

राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा २.०) अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या रुपये ३१६.०० कोटीच्या आराखडयास दि. २५ मे, २०१८ च्या प्रकल्प मंजूरी मंडळाच्या बैठकीमध्ये मंजूरी मिळालेली आहे. त्यामध्ये Enhancing Quality & Excellence in Select Autonomous Colleges या घटकातंर्गत राज्यातील १२ स्वायत्त महाविद्यालये यांचा समावेश आहे. उक्त स्वायत्त महाविद्यालयांना घटक क्रमांक ८ (Enhancing Quality & Excellence in Select Autonomous Colleges) अंतर्गत प्रत्येकी रु. ५.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने संबंधित स्वायत्त महाविद्यालयांनी त्यांच्या कामांचा तपशीलवार प्रकल्प अहवाल व कामांचे प्राधान्यक्रम संचालनालयाला सादर केले आहेत. केंद्र शासनाचा हिस्सा तसेच राज्य हिश्यापोटी उपलब्ध झालेला निधी संदर्भ क्र. २ अन्वये वितरीत करणे प्रस्तावित आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश -**

Enhancing Quality & Excellence in Select Autonomous Colleges या घटकाअंतर्गत केंद्र शासनाचा हिस्सा रु. १६.५० कोटी इतका निधी खालील तक्त्यात नमुद केलेल्या स्वायत्त महाविद्यालयांना प्रत्येकी

रुपये ०१.५० कोटी इतक्या निधीच्या प्रमाणात करावयाच्या कामांना खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | विद्यापीठाचे नाव | केंद्र हिस्सा (६०%) |
|---|---|---|
| १ | छत्रपती शाहू व्यावसायिक शिक्षण व संशोधन संस्था, कोल्हापूर | १,५०,००,०००/- |
| २ | धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा | १,५०,००,०००/- |
| ३ | रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, मुंबई | १,५०,००,०००/- |
| ४ | यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा | १,५०,००,०००/- |
| ५ | सिम्बॉसिस कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे | १,५०,००,०००/- |
| ६ | सेन्ट झेवियर्स स्वायत्त महाविद्यालय, मुंबई | १,५०,००,०००/- |
| ७ | सोफिया महिला महाविद्यालय, मुंबई | १,५०,००,०००/- |
| ८ | एसआयईएस कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई | १,५०,००,०००/- |
| ९ | बी. के. बिर्ला कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ठाणे | १,५०,००,०००/- |
| १० | मिठीबाई कला महाविद्यालय, चौहान विज्ञान संस्था आणि ए. जे. वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई | १,५०,००,०००/- |
| ११ | जय हिंद महाविद्यालय बसंतसिंह विज्ञान संस्था आणि जे.टी. लालवाणी वाणिज्य महाविद्यालय, मुंबई | १,५०,००,०००/- |
| | एकूण | १६,५०,००,०००/- |

अटी व शर्ती -

१) रुसा २.० च्या निधीसाठी राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वतंत्र बचत खाते उघडावे. त्या खात्यामध्ये दुसरा कोणताही व्यवहार करु नये.

२) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत साधनसामुग्री व उपकरणे खरेदी प्रक्रिया सर्व स्वायत्त महाविद्यालयांनी वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेतील तरतुदी तसेच शासनाने उद्योग उर्जा व कामगार विभागाच्या दि. ०१/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदी व त्या सोबतच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे सदरची खरेदी प्रक्रिया महाविद्यालयांनी प्रचलित पध्दतीनुसार पार पाडावी.

३) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान २.० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार संपूर्ण तपशीलवार प्रकल्प अहवालाच्या एकूण मंजूर रकमेच्या प्रमाणात नवीन बांधकाम, नूतनीकरण व उपकरण खरेदी यांचे प्रमाण अ. ५०:३०:२० ब. ४०:५०:१० क. ४५:४५:१० यापैकी एका प्रमाणात खर्च करणे बंधनकारक आहे. प्रकल्पात अहवालात इंटरफेस बैठकीत तज्ञांशी चर्चा झाल्यानंतर परस्पर सहमतीने योग्य बदल करावेत.

४) खरेदी, नवीन बांधकाम किंवा नूतनीकरण करण्यात येणाऱ्या बाबीवर राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान ( रुसा ) योजनेचा लोगो तसेच "रुसाच्या सौजन्याने" असे लिहून प्रथम दर्शनी दिसेल अशा स्वरुपात लावणे अनिवार्य आहे.

५) रुसा २.० अंतर्गत वितरित केलेला निधी महाविद्यालयांनी विहित कालावधीमध्ये खर्च पूर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी. महाविद्यालयांना वितरित करण्यात आलेल्या निधीच्या खर्चाची तसेच कामांची माहिती दर महिन्याच्या पहिल्या आठवडयात, तसेच झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र दर तीन महिन्यांनी विहित नमुन्यामध्ये तपशीलवार खर्चाच्या माहितीसह या संचालनालयास सादर करावे.

६) रुसा महाराष्ट्राच्या वतीने उपयोगिता प्रमाणपत्राची पडताळणी झाल्यानंतर रुसा Fund Tracking System मध्ये खर्चाचे निर्धारित विवरण अपलोड करण्यात यावे.

७) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे संनियंत्रण खालील नमुद केलेली प्रकल्प सनियंत्रण समिती करेल.

१) प्राचार्य / संचालक - समितीचे अध्यक्ष

२) प्राध्यापक प्रतिनिधी

३) रुसा समन्वयक

४) प्रबंधक - सदस्य सचिव

८) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान योजनेअंतर्गत प्राप्त निधीचे लेखापरीक्षण करुन अहवालाची प्रत प्रत्येक वर्षी रुसा राज्य प्रकल्प संचालनालयास पाठविण्यात यावी. तसेच त्यासाठी रोख वही (Cash Book) स्वतंत्रपणे ठेवण्यात यावी.

९) महाविद्यालयांनी / संस्थांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरिक्षण, महालेखापाल, महाराष्ट्र - १ किंवा प्रकरणपरत्वे महाराष्ट्र- २ नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून, त्यांनी मागणी केल्यास सर्व कागदपत्रे त्यांच्याकडे तपासणीकरीता उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

१०) महाविद्यालयांनी रुसा योजने संदर्भातील सर्व कागदपत्रे, लेखापरीक्षण अहवाल इ. या संचालनालयाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांना तपासणीस उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

११) महाविद्यालयांनी पुरवठादारास/ कंत्राटदारास अदा करावयाची देयकाची रक्कम PFMS द्वारे त्यांच्या बँक खात्यात वर्ग करावी. रोखीने व्यवहार करु नये.

१२) या आदेशान्वये प्रत्येकी रुपये ०१.५० कोटी इतका निधी PFMS द्वारे स्वायत्त महाविद्यालयांच्या रुसा अनुदानासाठी उघडलेल्या स्वतंत्र बचत बँक खात्यामध्ये वर्ग करण्यात येत आहे.

राज्य प्रकल्प सहसंचालक(प्र)
राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान (रुसा)
State Project Joint Director
State Project Directorate
Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan
Mumbai

प्रति-

१. प्राचार्य, छत्रपती शाहू व्यावसायिक शिक्षण व संशोधन संस्था, कोल्हापूर
२. प्राचार्य, धनंजयराव गाडगील वाणिज्य महाविद्यालय, सातारा
३. प्राचार्य, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय, मुंबई
४. प्राचार्य, यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा
५. प्राचार्य, सिम्बॉसिस कला व वाणिज्य महाविद्यालय, पुणे
६. प्राचार्य, सेन्ट झेवियर्स स्वायत्त महाविद्यालय, मुंबई
७. प्राचार्य, सोफिया महिला महाविद्यालय, मुंबई
८. प्राचार्य, एसआयईएस कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मुंबई
९. प्राचार्य, बी. के. बिर्ला कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ठाणे
१०. प्राचार्य, मिठीबाई कला महाविद्यालय, चौहान विज्ञान संस्था आणि ए. जे. वाणिज्य आणि अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई
११. प्राचार्य, जय हिंद महाविद्यालय बसंतसिंह विज्ञान संस्था आणि जे.टी. लालवाणी वाणिज्य महाविद्यालय, मुंबई
१२. उपसंचालक (वित्त), राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान
१३. निवड नस्ती (रुसा)